संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : १० वे ● ● अंक : १३७ वा ● ● शनिवार दि १८ जुलै २०२६ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# आटपाडीत पिस्तूल विक्रीसाठी आलेला तासगावचा युवक जेरबंद

## देशी बनावटीचे पिस्तूल व तीन जिवंत काडतुसे जप्त

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** आटपाडी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या धाडसी कारवाईत बेकायदेशीररीत्या देशी बनावटीचे पिस्तूल विक्रीसाठी घेऊन आलेल्या तासगाव तालुक्यातील एका युवकाला अटक केली आहे. आरोपीकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे असा एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक अमोल खरात यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, नेलकरंजी ते भिवघाट जाणाऱ्या रस्त्यावरील कालव्याजवळ एक संशयित इसम पिस्तूल विक्री करण्याच्या उद्देशाने थांबला आहे. या माहितीची खात्री करून पोलीस निरीक्षक संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

पथकाने संशयित इसमाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्याची अंगझडती घेतली असता कमरेला लपवून ठेवलेले देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ शस्त्र आणि काडतुसे जप्त करून आरोपीला अटक केली.

अटक करण्यात आलेल्या



आटपाडी : पोलिसांनी जप्त केलेले देशी बनावटीचे पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि अटक करण्यात आलेला आरोपी वैभव संपत माळी

आरोपीचे नाव वैभव संपत माळी (वय २३, रा. ढवळे वेस, ता. तासगाव, जि. सांगली) असे आहे. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला १८ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे ७० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल आणि ३ हजार रुपये किमतीची तीन जिवंत काडतुसे यांचा समावेश आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तुशार दोषी, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पवार, पोलीस उपनिरीक्षक अमोल खरात, पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब ठोंबरे, अर्जुन बोडखे, विष्णू भोईनवाड, सतीशकुमार जाधव तसेच इतर कर्मचाऱ्यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब ठोंबरे करीत आहेत.

# दिघंची अपघातातील दोन जखमींचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** दिघंची–आटपाडी मार्गावरील साळशींग मळा परिसरात भरधाव वेगाने व निष्काळजीपणे इर्टिगा कारने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत चार तरुण जखमी झाले होते. त्यांच्यावर सांगली येथील रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यापैकी यातील दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. अजून दोन गंभीर जखमी यांच्यावर सांगली येथे उपचार सुरु आहे. सदरची दुर्दैवी घटना ११ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी आटपाडी पोलिस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सौरभ वाघमारे



आदित्य जावीर

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल पोपट मंडले (वय २१, रा. माडगुळे) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी विशाल मंडले, अदित्य विनायक जावीर, दत्तात्रय हणमंत चव्हाण (सर्व रा. माडगुळे) तसेच सौरभ हणमंत वाघमारे (रा. आटपाडी) हे चौघेजण आटपाडीहून पुजारवाडी (दि.) येथे पोल उभारणीच्या कामासाठी हिरो एचएफ डिलक्स (एमएच १० बीक्यू ७५६०) या दुचाकीवरून जात होते.

दिघंची येथील एमएसईबी कार्यालयापासून सुमारे १०० मीटर अंतरावर साळशींग मळा परिसरात पोहोचताच, दिघंचीकडून आटपाडीच्या दिशेने येणारी सुझुकी इर्टिगा (एमएच १० ईके ७८५२) ही कार भरधाव वेगात, चुकीच्या बाजूने आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविण्यात आल्याने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात दुचाकीवरील अदित्य विनायक जावीर (रा. माडगुळे) यांचा रुग्णालयात दिनांक १५ रोजी मृत्यू झाला. तर सौरभ हणमंत वाघमारे (रा. आटपाडी)याचा दिनांक १६ रोजी सांगली येथेच उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर यातील फिर्यादी विशाल मंडले आणि दत्तात्रय हणमंत चव्हाण हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी कारचालक अनिल राजाराम सरताळे (रा. दिघंची, ता. आटपाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास आटपाडी पोलिस करत आहेत. या भीषण अपघातामुळे आटपाडी तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून दोन्ही मृत तरुणांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# आटपाडीच्या शेळी-मेंढी बाजारात महामार्ग पोलिसांकडून अनाधिकृत वसुली

## संतोष पुजारी : बाजार समितीची जिल्हा पोलीस प्रमुखांकडे तक्रार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विविध बाजारपेठांमध्ये महामार्ग पोलीसांकडून अनाधिकृत वसुली होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून याबाबत पोलीस अधीक्षक सांगली यांच्याकडे बाजार समितीचे सभपती संतोष पुजारी यांनी निवेदन देवून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आटपाडी तालुक्यातील खरसुंडी व करगणी येथे खिलार जनावरांच्या मोठ्या वार्षिक यात्रा भरतात. तसेच आटपाडी येथे दर शनिवारी पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठा शेळ्यामेंढ्यांचा बाजार भरतो. याशिवाय डाळींबाचे उघड लिलावही दररोज सुरू असून, डाळींब व्यवहारात दररोज ३५ ते ४० लाखांची उलाढाल होत आहे. शेळ्यामेंढ्या बाजारात ३ ते ४ कोटींची, तर जनावरांच्या यात्रांमध्ये ५ ते १० कोटींपर्यंत व्यवहार होतो.



संतोष पुजारी

या बाजारांमध्ये दर आठवड्याला सुमारे २५० ते ३०० वाहने येत असून, संबंधित वाहनांकडून काही ट्रॅफिक पोलिसांकडून अनाधिकृत वसुली केली जात असल्याच्या तक्रारी बाजार समितीकडे प्राप्त झाल्या आहेत. यापूर्वीही याबाबत संबंधित पोलिसांना सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, लेखी पत्रव्यवहार करूनही ही वसुली पूर्णपणे थांबलेली नसल्याचे समितीने नमूद केले आहे.

विशेषतः भिवघाट परिसरात शेतकरी व व्यापाऱ्यांच्या वाहनांकडून वसुली होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. हा प्रकार सुरू राहिल्यास शेतकरी हितास मोठा धक्का बसण्याची तसेच बाजारपेठांवर विपरीत परिणाम होऊन बाजार व्यवस्थाच कोलमडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर, महामार्ग पोलिसांच्या या पराक्रमाबाबत पोलिस उपअधिक्षकांना पत्र देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करून अनाधिकृत वसुली तात्काळ बंद करण्याची मागणी बाजार समितीने केली आहे.

# विलास मोरे यांच्या कुटुंबीयांना शिक्षकांचा आधार

## १.५० लाखांची मदत सुपूर्द : सामाजिक बांधिलकीचा उपक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील दिवंगत प्राथमिक शिक्षक विलास मोरे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्यासाठी आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समिती व तालुक्यातील शिक्षक बंधू–भगिनी यांच्या वतीने ₹१ लाख ५० हजारांची मदत सुपूर्द करण्यात आली. आटपाडी पंचायत समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात ही मदत मान्यवरांच्या हस्ते कुटुंबीयांकडे देण्यात आली.

या मदतीत दिवंगत विलास मोरे यांच्या दोन्ही मुलांच्या नावे प्रत्येकी ₹६५ हजारांच्या मुदतठेव पावत्या देण्यात आल्या, तर



आटपाडी : दिवंगत शिक्षक विलास मोरे यांच्या कुटुंबीयांना ₹१.५० लाखांची आर्थिक मदत व मुदतठेव पावत्या मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करताना उपस्थित शिक्षक, पदाधिकारी व मान्यवर.

त्यांच्या वयोवृद्ध आई–वडिलांच्या उपचारांसाठी ₹२० हजारांची आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी त्यांचे चिरंजीव वैष्णव, कन्या प्रणिती आणि आजोबा किसन शेंबडे यांनी ही मदत स्वीकारली.

कार्यक्रमाला आटपाडी पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय पाटील, आटपाडी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष यू. टी. जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी, जिल्हा परिषद सदस्य विनायक मासाळ, गटशिक्षणाधिकारी मयूर लाडे, शिक्षण विस्तार अधिकारी जगन्नाथ कोळपे, शिक्षक बँकेचे संचालक शरद चव्हाण, शिक्षक समितीचे जिल्हा संघटक संजय कबीर यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यामध्ये शिक्षक संघाचे अध्यक्ष यशवंत गोडसे, असिफ मुजावर, जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष नितीन गळवे, शिक्षक भारतीचे अध्यक्ष बिरू मुढे, पदवीधर संघटनेचे अध्यक्ष विलास गळवे, शिक्षक समितीचे अध्यक्ष इनताब इनामदार, सरचिटणीस जनार्दन मोटे तसेच शिक्षक पतसंस्था आटपाडीचे संचालक, शिक्षक नेते रमेश चव्हाण, भारत डिगोळे, किरण राऊत, श्रीरंग वायदंडे आणि तालुक्यातील मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

दिवंगत शिक्षक विलास मोरे यांच्या कुटुंबीयांना दिलेली ही आर्थिक मदत म्हणजे शिक्षक बांधवांच्या एकोप्याचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने मदतीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व दात्यांचे आभार मानण्यात आले.

# द एक्सलन्स अकॅडमीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## विविध स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** आटपाडी येथील द एक्सलन्स अॅकॅडमीच्या वतीने सन २०२६ मध्ये एमएचटी–सीईटी, नीट, जेईई तसेच विविध शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अॅकॅडमीचे संचालक प्रा. आशुतोष काटे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून संस्थेची शैक्षणिक






आटपाडी : येथील द एक्सलन्स अॅकॅडमीत आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अॅकॅडमीच्या वतीने सभापती दत्तात्रय पाटील यांचा सत्कार करताना मान्यवर

वाटचाल, विद्यार्थ्यांची उल्लेखनीय यशस्वी कामगिरी आणि अॅकॅडमीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून आटपाडी पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय (पंच) पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती आटपाडीचे सभापती संतोष पुजारी तसेच सांगली जिल्हा परिषद सदस्य विनायक शेठ मासाळ उपस्थित होते.

मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यश संपादन करण्यासाठी सातत्य, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवून प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या विद्यार्थ्यांना प्रा. हेमंत गायकवाड, प्रा. आशुतोष काटे, डॉ. पल्लव पोतदार, प्रा. विकास घाडगे आणि प्रा. शिवानी पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. हेमंत गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले.

या सत्कार सोहळ्यास पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला.

# निंबवडे सोसायटीच्या चेअरमनपदी सचिन मोटे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील निंबवडे येथील विविध कार्यकारी विकास सोसायटीच्या चेअरमनपदी भारतीय जनता पक्षाचे युवा नेते सचिन मोटे यांची, तर व्हाईस चेअरमनपदी विजय जाधव यांची सर्वानुमते निवड झाल्याबद्दल गावात सत्कार करण्यात आले.

सन १९३५ मध्ये स्थापन झालेल्या निंबवडे विविध कार्यकारी विकास सोसायटीला तालुक्यात विशेष महत्त्व असून, नव्याने निवड झालेल्या चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा निंबवडे पंचायत समिती गणाचे सदस्य जयवंत सरगर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत



आटपाडी : निंबवडे सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झालेल्या सचिन मोटे व विजय जाधव यांचा सत्कार करताना जयवंत सरगर व उपस्थित मान्यवर

त्यांच्या नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना मान्यवरांनी सहकार क्षेत्रातील या संस्थेची गौरवशाली परंपरा जपत शेतकरी, सभासद आणि गावाच्या विकासासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. सचिन मोटे व विजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीची अधिक प्रगती होईल, असा विश्वासही उपस्थितांनी व्यक्त केला.

समारंभास सोसायटीचे सर्व संचालक, पदाधिकारी, मान्यवर तसेच निंबवडे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंगणवाडी मदतनीस पदासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**सांगली :** एकात्मिक बाल विकास सेवा योजना सांगली ग्रामीण प्रकल्पांतर्गत अंगणवाडी मदतनीसांची १२ मानधनी पदे भरण्यात येणार असून, पात्र व स्थानिक महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक व पात्र महिला उमेदवारांनी २० ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, सांगली ग्रामीण कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत. मुदत संपल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

अंगणवाडी मदतनीस मानधनी पदभरतीसाठी गावनिहाय अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे पुढीलप्रमाणे – माधवनगर – ०२, हरिपूर – ०२, नांद्रे – ०१, बुधगाव – ०१, कसबे डिग्रज – ०१, तुंग – ०१, दुधगांव – ०१, कवठेपिरान – ०१, बिसूर – ०१ व सावळवाडी – ०१ अशी एकूण १२ रिक्त पदे अंगणवाडी केंद्रांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित गावातील रिक्त पदांसाठी केवळ त्या गावातील स्थानिक रहिवासी महिलांनाच अर्ज करता येणार असून, अंतिम निवडीचा अधिकार निवड समितीकडे राखीव ठेवण्यात आला आहे.

अर्जदाराचे वय ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षाचे वरील व ३५ वर्षाच्या आतील असावे. विधवा महिला उमेदवारासाठी वयोमर्यादा दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण व ४० वर्षाच्या आतील राहील. उमेदवार किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून, महिला उमेदवार ही संबंधित गावातील स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने फक्त आपल्या स्थानिक गावातील अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. या पदांसाठी लहान कुटुंबाची अट लागू राहणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

# वाक्षेवाडीत सिमेंट काँक्रीट रस्ता व स्ट्रीट लाईट कामांचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**
**आटपाडी / प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील मौजे वाक्षेवाडी येथे गावाच्या विकासाला चालना देणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्ता तसेच स्ट्रीट लाईट कामांचे उद्घाटन बहुजन हृदयसम्राट आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती, पंचायत समिती सदस्य व गटनेते जयवंत भाऊ सरगर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सरपंच राजाराम वाक्षे, मार्केट कमिटीचे माजी उपसभापती व माजी सरपंच आप्पासाहेब वाक्षे, चेअरमन कैलास बापू देवडकर, चेअरमन





वाक्षेवाडी : येथे सिमेंट रस्ता व स्ट्रीट लाईट कामांचे उद्घाटन करताना आ. गोपीचंद पडळकर यावेळी उपस्थित जयवंत सरगर, सरपंच राजाराम वाक्षे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

बाजीराव बुधे, माजी ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र कोकरे, युवा नेते बाजीराव नाना पिंजारी, वासुदेव वाक्षे, सत्यवान शेठ वाक्षे, दादासो पिंजारी, ग्रामपंचायत सदस्य मारुती पुकळे, बाजीराव वाक्षे, बी. के. वाक्षे सर, दशरथ वाक्षे, सुखदेव बुधे, दिलीप वाक्षे, जोतीराम वाक्षे, दगडू वाक्षे सर यांच्यासह गावातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी गावातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी दर्जेदार विकासकामे राबविण्याची ग्वाही दिली. सिमेंट काँक्रीट रस्त्यामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्यास मदत होणार असून स्ट्रीट लाईटमुळे गावातील नागरिकांच्या सुरक्षिततेत भर पडणार आहे. या विकासकामांमुळे वाक्षेवाडीच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच गती मिळणार असल्याची भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.